# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  २६/०३/२०२३

## खुन

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | नांदगावपेठ अप क्र ११६/२०२३ चे ३०२,५०६, ३४ भादवी | शिव पार्वती नगर नांदगापेठ फिर्यादीचे घराचे पोर्च मध्ये | दि २६/०३/२३ चे ०३/४५ वा<br><br>दि २६/०३/२३ चे ०४/३० वा<br><br>दि २६/०३/२३ चे ०९/४१ वा | लक्ष्मण वासुदेवराव सिंगनजुडे  वय ४७ वर्षे रा.शिवपार्वती नगर नांदगावपेठ ता.जि. अमरावती | अज्ञात २ इसम<br><br>१) एक २५ ते २७ वर्षे वय असलेला उंची अंदाजे ५ फुट अंगाने सडपातळ तसेच अंगात ठिपके असलेली शेद्री रंगाची टी शर्ट गोल टोपी परीधान केलेला<br>२)एक अंदाजे २५ ते ३० वर्षे असलेला उंची अंदाजे ५.५. फुट सहपात्ळ बांधा | हकीगत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे दि २५/०३/२३ रोजी पत्नी व मूलाबाळा सह जेवण करुन रात्री अंदाजे ११/३० वा सुमारास झोपले असता फि चे  घराचे पोर्च मधुन भैय्या बचाव भैय्या बचाव असा जोरात आवाज आल्याने फि ने दरवाजा उघडुन बाहेर जात असता त्यांचे पत्नी ने मनाई केली व फि ने खिडकीतुन बाहेर पाहीले असता दोन इसम तिसऱ्या इसमाला मारहान करित असतांना दिसले फि छोडो छोडे वरना मै पोलीस को बता दुगा असे म्हटले असता त्या दोन इसमा पैकी एकाचे फि ला चाकु दाखवुन धाक दाखविला फि ने पोलीस यांना माहीती दिली व व बाहेर येवुन पाहिले असता एक अनोलखी इसम रक्तात्या थारोड्यात पडलेला होता त्या इसमाचे गळयाचे भोवती चाकुन वार केला होता.जखमीस मारहान करणाऱ्या इसमांचे वर्णन १) एक २५ ते २७ वर्षे वय असलेला उंची अंदाजे ५ फुट अंगाने सडपातळ तसेच अंगात ठिपके असलेली शेद्री रंगाची टी शर्ट  गोल टोपी परीधान केलेला २)एक अंदाजे २५ ते ३० वर्षे असलेला उंची अंदाजे ५.५. फुट सहपात्ळा बांधा परत पाहील्यावर ओळखेन आज दि २६/०३/२३ रोजी सकाळी ०३/३५ वा सुमारास फि व फि चे परीवारातील सदस्य झोपले असता दोन अनओळखी इसमानी  पाठलाग करत येवुन एक २५ ते २७ वर्षे वय असलेल्या अनओळखी इसमास फि चे घराचे पोच मध्ये चाकुन गळयावर वार करुन त्यास जिवे मारले अशा फि यांचे जबाणी वरुन सदरचा गुन्हा दाखल. |

## दुखापत

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ७ | १० |
| १. | पो.स्टे.बडनेरा अप.क्र.२३०/२०२३ कलम ३२४ , ५०४ , ३४ | बस स्टँड रोड , नवी वस्ती बडनेरा | दि.२६.०३.२०२३ चे १२.०० वा. माहिती दि.वेळ दि.२६.०३.२०२३ चे १२.४५ वा. दाखल.ता.वेळ दि.२६.०३.२०२३ चे १४.४९ वा. | दोन अनोळखी मुले | हकीकत अशाप्रकारे आहे की, नमुद घटना.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा त्याच्या बहिणीसह रस्त्याने जात असतांना यातील दोन अनोळखी आरोपी हे बाजुला उभे होते. त्यापैकी एकाने फिर्यादीस आवाज देवुन बोलाविले व फिर्यादीस म्हटले की, तु सोलेशन का नशा करता है क्या ? यावर फिर्यादीने मै नशा नही करता असे म्हटले असता त्या अनोळखी आरोपीने फिर्यादीस काठीने फि.चे डोक्याचे मागे व मानेवर मारून जखमी केले तसेच दुस-या अनोळखी मुलाने फिर्यादीस शिवीगाळ केली. अशा फि.च्या जबानी रिपोर्टवरून व मेडीकल सर्टीफिकेटवरून सदरचा गुन्हा दाखल. |

## घरफोडी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पोस्टे राजापेठ अप क्र. ३१४/२३ कलम ४५४,४५७,३८० भा.द.वि. | श्रीकृष्ण विहार सातुर्णा, अमरावती | दि. २०/०२/२३ चे १६.०० वा. ते दि. २६.०३.२०२३ चे ०९.०० वा. दरम्यान दा. ता. वेळ - दि. २६/०३/२३ चे ११.२४ वा. | सत्यम संजय पाटील वय २७ वर्ष रा. श्रीकृष्ण विहार दिल्ली पब्लीक स्कुल रोड सातुर्णा, अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फीर्यादी कुटुंबासह आजीचे अंत्यविधीसाठी मुळ गावी बरेच दिवसांकरीता गेलेले असतांना कुणीतरी अज्ञात चोराने मागील दाराचे कुलुप तोडुन घरात प्रवेश करुन फिर्यादीचे आईचे पर्समधुन एक ३० ग्रॅम सोन्याचे मंगळसुत्र कि अं १,४०,०००/- रु व नगदी १२०००/- रु असे एकुण १,५२,०००/- रु. चा मुददेमाल चोरुन नेला. अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून DO आदेशाने सदरचा गुन्हा दाखल. |

# चोरी

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| २. | पो.स्टे.बडनेरा अप.क्र.२२९/ २०२३ कलम ३७९ , ३४ भा.दं.वि. | शेतशिवार सर्वे नं.३६ , भानखेडा बु. ता.जि.अमराव ाती | दि.२५.०३.२०२३ चे २३.३० वा. ते दि.२६.०३.२०२३ चे ००.०० वा.<br>माहिती वेळ दि.२६.०३.२०२३ चे १२.३० वा.<br>दाखल.ता.वेळ दि.२६.०३.२०२३ चे १३.३४ वा. | रवि गोपाळराव सदार , वय ५५ वर्षे , धंदा - शेतमजुरी , रा.भानखेडा बु. ता.जि.अमरावती | दोन ते तीन अनोळखी इसम | हकीकत अशाप्रकारे आहे की , यातील फिर्यादी हे मक्त्याने शेती करतात. काल दि.२५.०३.२०२३ रोजी फिर्यादी यांनी त्यांचे शेतातील गहु हार्वेस्टरने काढुन १० कट्टे गहु कट्ट्यात व बाकी गहु गंज्जी लावुन ती गंज्जी तळवने झाकुन ठेवुन जेवणाकरीता घरी गेले. त्यानंतर जेवण करून परत शेतात आले असता त्यांनी त्यांच्याजवळील बॅटरीचा उजेड केला असता त्यांना शेतातुन दोन ते तीन इसम पळतांना दिसले. नमुद घटना.ता.वेळी व ठिकाणाहुन दोन ते तीन अनोळखी इसमांनी फि.चा शेतात ठेवलेला प्रत्येकी ५० कि.ग्रँ. वजनाचे १५ कट्टे गहु एकुण वजन ७५० कि.ग्रँ. किं.अं.१५००० रू. चा माल लाल रंगाच्या दुचाकीने ज्याच्या नंबर प्लेटवर BOSS असे इंग्रजीत लिहीलेले होते त्यावरूघेवुन चोरून नेला. अशा फि.च्या जबानी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल. |